CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित. ▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३३३ ▶ गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०२२ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ०६




# आमदार अपात्रेबाबतच्या सुनावणीला वेग

## नार्वेकरांनी जारी केल्या तारखा

## २३ नोव्हेंबरपर्यंत चालणार प्रक्रिया

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबाबतच्या याचिकेसह दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. याप्रकरणी निर्णय घेण्यास विलंब होत असल्याच्या कारणावरून नुकतेच सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना फटकारले होते. त्यानंतर आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून वेगवान हालचाली सुरू झाल्या असून नार्वेकर यांच्या न्यायाधिकरणाने अखेर अपात्रतेबाबतच्या सुनावणीच्या कामकाजाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. अशातच आता आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

यावेळी बोलतांना राहुल नार्वेकर म्हणाले की, या विषयावर अधिक बोलणे उचित राहणार नाही. या याचिका ठरवत असतांना कोणत्याही प्रकारची दिरंगाई केली जाणार नाही. परंतु, कोणत्याही प्रकारची घाईही केली जाणार नाही. ज्यामुळे अन्याय होईल. कालच्या निकालात सुनावणी कशी होणार, त्याची प्रक्रिया काय असणार यासंदर्भातील माहिती सर्व पक्षकारांना दिली आहे. त्याचप्रमाणे ही कारवाई पुढे जाईल. पुढे बोलतांना ते म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष हे घटनात्मक पद आहे. न्यायालायनेही योग्य ती सूचना दिली आहे. न्यायालयाचा मान राखला जाईल. अध्यक्षांचीही बाजू न्यायालयात मांडली जाईल, असेही राहुल नार्वेकर यांनी १६ आमदारांच्या अपात्रता प्रकरणाविषयी होत असलेल्या दिरंगाईबद्दल सांगितले.



### अध्यक्षांनी पक्षपात करु नये

**विधानसभा अध्यक्ष हे कोणत्याही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते नाहीत. त्यामुळे विधासभा अध्यक्षांसमोर सर्वांचा गुन्हा सारखाच आहे. राज्यपाल, मुख्यमंत्री आमदार प्रतोद यांच्या चुका सारख्याच आहेत. त्यामुळे अध्यक्षांनी पक्षपात न करता निर्णय द्यावा, अशी मागणी अनिल परब यांनी केली आहे.**

### ठाकरे गटाकडून प्रतिज्ञापत्रातून पाच मुद्यांवर भर

**ठाकरे गटाने २५ सप्टेंबर रोजीच्या सुनावणीत अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केलं आहे, ज्यामध्ये पाच मुद्द्यांचा समावेश आहे. त्यामुळे या आधारावर एकत्रित सुनावणी घेऊ शकतो असा ठाकरे गटाचा दावा आहे.**

### सुप्रीम कोर्टाच्या दट्ट्यानंतर आता तारखा

**आमदार अनिल परब म्हणाले की, विधानसभा अध्यक्षांचे वेळापत्रक ही धूळफेक आहे. सुप्रीम कोर्टाच्या दट्ट्यानंतर आता तारखा पडत आहेत. आम्ही एक प्रतिज्ञापत्र दिलं आहे पुरावे पाहण्याची गरज नाही. वेगवेगळी सुनावणी घेण्याची गरज नाही. २३ नोव्हेंबरपर्यंतच्या तारखा कळवल्या आहे. त्यानंतर उलट तपासणी सुरु होणार आहे. परंतू उलट तपासणी किती वेळ चालणार काही माहिती नाही. एक महिन्याच्या कालावधीत हे प्रकरण संपवायला हवे. आतापर्यंत निकाल लागला पाहिजे होता. सर्वोच्च न्यायालयात जेव्हा हे टाइमटेबल दिले जाईल, तेव्हा आम्ही आमची बाजू मांडू.**

### उद्या अंक नाही

आज दि.२८ सप्टेंबर २०२३ रोजी अनंत चर्तुदशी निमित्त दै.लक्ष महाराष्ट्र कार्यालयास सुटी असल्याने उद्या दि.२९ सप्टेंबर २०२३ चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते बांधवांनी नोंद घ्यावी.

**- संपादक**

## न्यूज कॉलम

### मोहाडी पोलिसांत तीन चालकांवर गुन्हा

**धुळे ।** मुंबई- आग्रा महामार्गावर बेदरकारपणे वाहन चालविल्याने मोहाडी पोलिस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. राजू प्रभू कुमार (ट्रेलर एनएल ०१, एसी ०७७६, रा. मध्य प्रदेश), (ट्रेलर एमएच ०४, एलई ६१३६, रा. उत्तर प्रदेश), जावेद अख्तर मोहंमद अकबर (ट्रक एमएच ०४, केएफ ८५२८, रा. उत्तर प्रदेश) या तिघांवर गुन्हा दाखल झाला.

### महिलेला मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** महिलेला लाथांनी मारहाण केल्याप्रकरणी एकावर निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याबाबत अंजनाबाई सुरेश वाघ (रा. भडगाव, ता. साक्री) यांच्या फिर्यादीनुसार त्यांचा मुलगा सोमनाथ वाघ काहीतरी बोलला, असा गैरसमज करून गावातील नीलेश भास्कर वाघ याने २३ सप्टेंबरला सायंकाळी त्याच्याशी वाद घातला.

# नाशिकच्या सिडको परिसरातील घरात भीषण स्फोट

### घराच्या काचा फुटल्या, तीन जण जखमी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरात धक्कादायक घटना घडली असून सिडको परिसरातील एका घरात भीषण स्फोट झाल्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत घरातील तीन सदस्य गंभीर जखमी झाले असून घराच्या काचा देखील फुटल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हा स्फोट घरात वापरल्या जाणाऱ्या डिओड्रंटमुळे झाल्याचे प्रथमदर्शनी सांगण्यात येत आहे. मात्र पोलिसांची टीम घटनास्थळी दाखल झाली असून घटनेचा तपास सुरु आहे तर जखमींना नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

आपल्या घरात अशा अनेक वस्तू असतात, ज्यामुळे अनेकदा अनुचित प्रकार घडण्याची शक्यता असते. यात मोबाईल, गॅस सिलेंडर, गिझर त्याचबरोबर डिओड्रंट हा सुद्धा कुटुंबियांसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता असते. याचाच प्रत्यय नाशिकमधील एका कुटुंबियांना आला आहे. घरात वापरला जाणारा डिओड्रंट नाशिकमधील एका



कुटुंबियांसाठी काळ बनून आला होता, मात्र सुदैवाने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. सिडको भागातील उत्तमनगर परिसरात राहणाऱ्या गांगुर्डे यांच्या घरात ही भीषण स्फोटाची घटना घडली आहे. आज सकाळच्या सुमारास घरात लगबग सुरु असताना अचानक डिओड्रंटचा स्फोट झाल्याने घरातील तीन सदस्य जखमी झाले. शिवाय घराच्या काचांसह आजूबाजूला असलेल्या वाहनांच्या काचा देखील फुटल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. दरम्यान उत्तमनगर परिसरात तुळजा निवास या घरात गांगुर्डे कुटुंबीय वास्तव्यास आहे. आज सकाळी नेहमीप्रमाणे घरातल्या कुटुंबीयांची लगबग सुरु होती. याचवेळी घरात मोबाईल चार्जिंगला लावलेला होता. याच मोबाईलच्या बाजूला डिओड्रंट आणि काही कॉस्मेटिक ठेवण्यात आले होते. त्यामुळे मोबाईलच्या उष्णतेने डिओड्रंटचा मोठा स्फोट झाल्याचे सांगण्यात येत आहे. सदर स्फोट इतका गंभीर होता की, त्यामुळे संपूर्ण घराला आग लागली, काचा फुटल्या. तसेच शेजारच्या घराच्या काचा फुटल्या असून समोरच्या भागातील दोन गाड्यांच्या काचा फुटून नुकसान झाल्याचे नागरिक सांगत आहेत. दरम्यान घरात दोन मोबाईल जळालेल्या अवस्थेत आहेत, मात्र चार्जिंग सॉकेट जळालेले नाहीत. परफ्युमच्या बॉटल आणि इतर काही साहित्य घराबाहेर फेकलं गेलं आहेत, पण त्यांना आगीचा फटका बसलेला नाही. परिसरातील नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार सिलेंडरचा स्फोट झाल्यासारखा आवाज झाल्याने आम्ही घाबरलो आणि घराबाहेर पळत सुटलो, घरात आग लागल्याने आम्ही पाणी टाकून ती विझवली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या मुंबई अध्यक्षपदी समीर भुजबळ

### समीर भुजबळ मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतील - उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेत मंत्री छगन भुजबळ यांचे मोठ योगदान आहे. त्याचप्रमाणे पक्षाच्या सर्व कामाची जबाबदारी बॅकस्टेजला राहून समीर भुजबळ यांनी पार पाडली. काल मुंबई अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली असून या पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला.

मुंबईतील गरवारे क्लब हाऊस येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बैठकीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते व मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत समीर भुजबळ यांना नियुक्ती पत्र देण्यात आला. यावेळी आयोजित




कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी महिला प्रदेशाध्यक्षा तथा महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, माजी आमदार पंकज भुजबळ, युवक अध्यक्ष सुरज चव्हाण, प्रमोद हिंदुराव, शिवाजीराव नलावडे, मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, सुनीता शिंदे, सिद्धार्थ कांबळे, ड. रविंद्र पगार, मुकेश गांधी, अर्शद सिद्दीकी, महेंद्र पानसरे, संजय तटकरे, संतोष धुवाळी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पोलिसांचे धुळ्यात पथसंचलन



**धुळे । गणेश विसर्जनासाठी पोलिसांनी जय्यत तयारी केली आहे. शहरात नऊ ठिकाणी विसर्जन होणार आहे. मिरवणुकीवर अधिकारी कर्मचारी बंदोबस्तासाठी नेमण्यात आले असल्याची माहिती पोलिसांच्या वतीने देण्यात आली.**

# सिडकोत ११ ठिकाणी गणेश मूर्ती संकलन केंद्र, विसर्जनाचे ठिकाण

**सिडको । प्रतिनिधी**

मनपा हद्दीतील सिडको परिसरात गणेश मूर्ती संकलन केंद्र व गणपती विसर्जन करण्याचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. गुरुवारी दहाव्या दिवशी अनंत चतुर्दशी असल्याने सकाळी ८ वाजेपासून ते रात्री उशिरा मूर्ती संकलन होईपर्यंत हे केंद्र सुरू राहणार आहे. यामध्ये ठिकठिकाणी कृत्रिम तलाव तयार करण्यात आलेले आहेत.

यामध्ये गोविंदनगर येथील जिजाऊ वाचनालय, जुने सिडको येथे राजे छत्रपती व्यायामशाळेजवळ, कर्मयोगीनगर येथे राजे संभाजी महाराज व्यायाम शाळेजवळ,



राजीवनगर रामनगर येथील डे केअर शाळा, सिहस्थनगर येथील राजे संभाजी स्टेडियम, पवननगर जलकुंभ, कामटवाडे येथील मीनाताई ठाकरे शाळा, गामणे मैदान, वासननगर हे कृत्रिम तलाव म्हणून तर पिंपळगाव खांब येथील वालदेवी नदी घाट हा नैसर्गिक तलाव म्हणून निश्चित करण्यात आला आहे. विभागीय अधिकारी डॉ मयूर पाटील तसेच बांधकाम विभागाचे अभियंता हेमंत पठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली या विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे विभागीय स्वच्छता निरीक्षक संजय गांगुर्डे व कर्मचारी तसेच बांधकाम विभागाचे आर. आर. ठाकूर, रत्नपारखी आदी अधिकारी व कर्मचारी यांची सदर ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली आहे. या ठिकाणी मंडप, टेबल-खुर्ची, विसर्जन कुंड आदींची व्यवस्था करण्यात आली आहे.

# एम आय एम कार्यकर्त्यांनी उघड केला पुरवठा विभागाचा भोंगळ कारभार

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील अनेक रेशन दुकानदार संदर्भात नागरिकांचे तक्रार होत्या त्याबाबत आ.फारुख शाह यांनी पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्याशी चर्चा केली व पुरवठा खात्यातील पुरवठा निरीक्षक मायानंद भामरे व एम आय एम पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष दीपश्री नाईक, एजाज सय्यद, यांनी धुळे शहरातील रेशन दुकांनांना भेट देवून उपस्थित नागरिकांच्या सहिने वस्तुस्थितीजन्य पंचनामे करून घेतले.

सविस्तर चौकशी केली असता शहरातील अनेक दुकाने बंद होती तसेच शहरातील दुकान नंबर ३५ या येथे दीडशे कट्टे गहू आणि तांदूळ शिल्लक होते तसेच किट सुद्धा शिल्लक होती. त्या संदर्भात विचारणा केली



असता दुकानदाराला नीट उत्तर देता आले नाही तसेच दुकान नंबर ३७ येथे मुळ दुकानदार उपलब्ध नव्हता व त्याचे दुकान दुसराच व्यक्ती अनाधिकृत पणे चालवत होता. या संदर्भात पंचनामे सुद्धा करण्यात आले आहेत.एकूणच पाहणी केल्यानंतर निष्कर्ष निघतो की धुळे शहरात मोठ्या प्रमाणात रेशन रॅकेट सुरू असून गरिबांच्या हक्काचे अन्न त्यांच्या तोंडातून हिसकावून खुल्या बाजारात विक्री करून मोठ्या प्रमाणात काळाबाजार चालू आहे. तसेच शासनाने चागल्या हेतूने आनंदाचा शिधा हा उपक्रम सुरू केला. या योजनेचे वाटोळे पुरवठा विभाग आणि रेशन दुकानदार यांनी संगनमताने चालविले आहे. त्याच्या किट वाटपात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार दिसून येत आहे आणि त्याला पुरवठा अधिकारी व पुरवठा खात्यातील कर्मचारी जबाबदार असण्याची शक्यता आहे. या संदर्भात पुरवठा खात्यातील अधिकाऱ्यांची चर्चा केली असता त्यांनी उडवा ओळीचे उत्तरे दिले व प्रधानमंत्री अन्नसुरक्षा योजनेतील धान्य आजपर्यंत सुद्धा दुकानदारांनी साठा करून ठेवलेला आहे म्हणजे लोकांना धान्य द्यायचे नाही आणि साठा उपलब्ध उपलब्ध कसा हा मोठा प्रश्न निर्माण होतो. यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे त्या संदर्भात एमआयएम पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी यांनासुद्धा तक्रार देण्यात आलेली आहे व धुळे शहरातील जनतेच्या धान्याचा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू असून त्याबाबत शहरातील संपूर्ण दुकानाची चौकशी करण्यात यावी व सुमारे दोन वर्षाचा पूर्ण नियतनाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी अशी एका पत्राद्वारे आ.फारुख शाह यांनी मागणी केलेली आहे. तसेच विधवा परित्यक्ता व दिव्यांग बांधवांचे रेशन कार्ड आज पर्यंत ऑनलाईन झाले नसल्यामुळे ते अन्नधान्यापासून वंचित राहत आहे त्याची सुद्धा दखल घेण्यासंदर्भात पत्र देण्यात आले आहे.

# सावकाराचा जाच; ३३ वर्षीय शिक्षकाने संपविले जीवन

**धुळे । प्रतिनिधी**

सावकाराकडून पैसे घेतले असल्याने ते परत मिळावे यासाठी सावकाराचा सातत्याने तगादा सुरु होता. साक्री तालुक्यातील निजामपुर गावात आदर्श विद्या मंदिर शाळेत असलेले शिक्षक आंनदा रतन चव्हाण यांनी काल दि.२६ सप्टेंबर रोजी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली आहे. सावकाराच्या जाचाला कंटाळून ३३ वर्षीय शिक्षकाने आत्महत्या केल्याची घटना धुळ्यात घडली आहे. यानंतर शिक्षकाचे नातेवाईक आक्रमक झाले असून पोलीस ठाण्याबाहेरच ठिय्या आंदोलनाला सुरवात केली आहे.

आनंदा चव्हाण यांनी खासगी सावकाराकडून कर्ज घेतले होते. हे पैसे परत घेण्यासाठी सावकाराचा तगादा सुरु होता. सावकारांनी पैशांसाठी संबंधित युवा शिक्षकास त्रास दिल्यानेच शिक्षकाने टोकाचे पाऊल उचलले असल्याचा नातेवाईकांचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. संबंधित सावकारांस जोपर्यंत पोलीस ताब्यात घेऊन कठोरात कठोर शासन होत नाही; तोपर्यंत निजामपूर पोलीस ठाण्याबाहेरच ठिय्या आंदोलन करण्यावर संतप्त नातेवाईक ठाम होते.

## अध्यक्षांवर दबाव; लोकशाहीला घातक

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या आमदारांना विधानसभा अध्यक्षांनी अपात्र ठरवावे म्हणून उबाठा सेनेला घाई झाली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांचा वेळकाढूपणा, ढकलगाडी चालूच, असे आरोप करणे हे आणखी गंभीर आहे. अध्यक्ष हे न्यायमूर्तींच्या भूमिकेतून अपात्र आमदार प्रकरणाची चौकशी करीत आहेत. अशा वेळी त्यांच्या कामकाजाच्या हेतूसंबंधी टीकाटिप्पणी करणे किंवा आरोप करणे हे संसदीय लोकशाहीचा तसेच न्यायव्यवस्थेचा अवमान करणारे आहे. सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घ्या, अशी मागणी उबाठा सेनेने केली आहे. अर्थातच शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने त्याला विरोध दर्शवला आहे. सर्व कागदपत्रे व पुरावे उपलब्ध असताना अध्यक्ष वेळकाढूपणा करीत आहेत, असे आरोप करणे न्यायदानावर अविश्वास दाखविण्यासारखे नाही का? भारतीय जनता पक्षाचे लढाऊ आमदार नितेश राणे यांनी विधानसभा अध्यक्षांवर दबाव टाकणाऱ्या उबाठा सेनेच्या नेत्यांवर कारवाई करावी, अशी ठोस मागणी विधिमंडळ सचिवांकडे केली आहे. विधानसभा नियम २७४ नुसार त्यांनी हक्कभंग प्रस्तावही दिला आहे. खासदार संजय राऊत, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व उबाठा सेनेचे अन्य नेते ज्या पद्धतीने विधानसभा अध्यक्षांवर दबाव टाकत आहेत ते नियमांचा भंग करणारे आहेत. विधिमंडळ हे न्यायमंडळ आहे व त्याचे प्रमुख म्हणून राहुल नार्वेकर हे अध्यक्षपदावर आहेत. त्यांच्यावर व त्यांच्या कामकाज पद्धतीवर टीका करणे हे नियमांचा भंग करणारे आहे. खरे तर जे सदस्य विधिमंडळात किंवा संसदेत आहेत, त्यांना संसदीय कामकाज पद्धतीचे नियम ठाऊक असले पाहिजेत. पण त्यांनीच पीठासीन अधिकाऱ्यांवर दबाव टाकणारी वक्तव्ये केली, तर त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. सुनावणीची पुढील तारीख आता १३ ऑक्टोबर आहे. कागदपत्रांची तपासणी, पुराव्याची छाननी, साक्षी नोंदवणे, उलट तपासणी या सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडाव्याच लागतील. अशा वेळी लवकर निर्णय द्या, अशी घाई करून कसे चालेल? उबाठा सेनेच्या वतीने आमदारांच्या अपात्रतेवरील सुनावणीस उशीर होत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयात अर्ज करण्यात आला होता. एका याचिकेद्वारे विधानसभा अध्यक्षांना या प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्यास सांगावे, अशी मागणी उबठा सेनेने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशावरूनच १४ सप्टेंबरला अध्यक्ष नार्वेकरांनी पहिली सुनावणी घेतली. दुसरी सुनावणी २५ सप्टेंबरला झाली. सुनावणीसाठी तारखा पडतात, यात नवीन काय आहे? आमदार अपात्रतेप्रकरणी एकूण ३४ याचिका आहेत. सुनावणी कशी घेणार, वेळापत्रक कसे असेल, किती वेळ लागेल असे अनेक प्रश्न उबाठा सेनेकडून विचारले गेले, पण शिंदे यांच्या शिवसेनेने त्याला जोरदार आक्षेप घेतला. सर्व याचिकांची एकत्रित सुनावणी घ्यावी, सर्व ३४ याचिकांची एकत्रित सुनावणी घेतली तर या प्रकरणावर निकाल लवकर लागू शकेल, असे उबाठा सेनेचे म्हणणे आहे. पण या प्रकरणात विधानसभा अध्यक्षांकडून उबाठा सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे व शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनाही नोटिसा पाठवल्या जाण्याची शक्यता आहे. तसे झाले तर सुनावणीला वेळ लागू शकतो याचे भान उबाठा सेनेचे नेते का ठेवत नाहीत? उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत बंड करणाऱ्या ४० आमदारांना अपात्र ठरविण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने ११ मे रोजी निकाल दिला होता. विधानसभा अध्यक्षांनी ठरावीक मुदतीत निर्णय घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना म्हटले होते. उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना अडीच वर्षांत कसे वागले. त्यातून पक्षात मोठा उठाव झाला. ते जर काँग्रेसच्या नादी लागले नसते, त्यांनी जर भाजपबरोबर युती तोडली नसती, पक्षातील बहुसंख्य आमदार आपण भाजपबरोबर जाऊ या, असे सांगत असताना ते मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीला चिकटून राहिले, काँग्रेसच्या आहारी गेले, त्यातून पक्षात असंतोष वाढत गेला. आपले काय चुकले याचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी त्यांना व त्यांच्या पक्षाला शिंदे गटाचे आमदार अपात्र ठरविण्याची घाई झाली आहे.

# कॅनडात खलिस्तानवादी मोकाट कसे?

भारतात खलिस्तानची निर्मिती व्हावी अशी मागणी करणाऱ्या कॅनडातील खलिस्तानवाद्यांना कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो संरक्षण देत आहेत व त्यांचे समर्थनही करीत आहेत. भारताने ज्यांना दहशतवादी घोषित केले, अशा दोन डझन खतरनाक खलिस्तानवाद्यांची यादी भारताने कॅनडाला यापूर्वीच दिली आहे. पण त्यावर कॅनडा सरकारने कोणताही कारवाई केलेली नाही किंवा कारवाई करण्याची तयारीही दर्शवलेली नाही. उलट भारताने फरार म्हणून घोषित केलेल्या हरदीप सिंह निज्जर या खलिस्तानवाद्याची कॅनडात हत्या झाल्यानंतर त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी स्वतःच त्या हत्येत भारतीय एजन्सीचा हात आहे असे जाहीर करून भारतालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. कॅनडाचे पंतप्रधान भारत सरकारने ज्यांना दहशतवादी म्हणून घोषित केले आहे, त्यांचीच बाजू का घेत आहेत? खलिस्तानवाद्यांना संरक्षण देणे व त्यांचे समर्थन करणे हे भविष्यात कॅनडालाही महागात पडू शकते.

खलिस्तानवाद्यांनी पंजाबमध्ये चार दशकांपूर्वी रक्तरंजित हिंसाचार घडवला होता. काही काळाने हेच खलिस्तानवादी कॅनडामध्ये हिंसाचाराचा धुडगूस घालतील तेव्हा पंतप्रधान जस्टिन ट्रुडो काय करतील? खलिस्तानवाद्यांचे कॅनडामध्ये तेथील सरकारने लाड चालूच ठेवले, तर तेच भविष्यात कॅनडामध्येच खलिस्तानची मागणी करतील तेव्हा पंतप्रधान जस्टिन ट्रुडो त्यांना रोखू शकतील का?

जेव्हा भारतात खलिस्तान चळवळ जोरात होती तेव्हा जे घडले, ते भविष्यात कॅनडामध्ये घडू शकते. भारतात भिंद्रानवाले निर्माण झाले आणि त्याने सरकारलाच कसे आव्हान दिले हे सर्व देशाने अनुभवले आहे. जेव्हा इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत ऑपरेशन ब्लू स्टार मोहीम राबवली गेली आणि अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातून दहशतवाद्यांना वेचून वेचून भारतीय सैन्य दलाने संपवले. त्यानंतर खलिस्तानची चळवळ संपुष्टात आली. हा सर्व इतिहास जगापुढे असताना कॅनडाचे सत्ताधारी तेथील खलिस्तानवाद्यांना का आश्रय देत आहेत व त्यांचे समर्थन करून भारत सरकारलाच का जाब विचारत आहेत?

पंजाबमध्ये खलिस्तानवादी चळवळ जोरात होती तेव्हा पंजाबातील हिंदूंनी पंजाब सोडून निघून जावे असे फर्मान काढले होते. आता कॅनडामधील हिंदूंनी भारतात निघून जावे असा फतवा शीख फॉर जस्टिसचा म्होरक्या गुरपतवंत सिंह पन्नू याने अमेरिकेतून काढला आहे. जे पंजाबमध्ये घडले तसे आता कॅनडात घडू लागले, तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे?

पंजाब राज्यात १९८० मध्ये खलिस्तानवाद्यांची चळवळ जोर धरू लागली तेव्हा तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने त्याकडे सुरुवातीला दुर्लक्ष केले. पंजाबमध्ये हिंदूंवर हल्ले होऊ लागले व तेथील हिंदू पंजाब सोडून दिल्लीकडे जाऊ लागले तेव्हा इंदिरा गांधींना त्याचे गांभीर्य समजले. भिंद्रानवाले याची लोकप्रियता वेगाने वाढली तेव्हा सुरुवातीलाच त्याला चाप लावायला हवा होता. पण केंद्र सरकारने तेव्हा तसे काहीच केले नाही. पण भिंद्रानवाले जेव्हा भारत सरकारलाच डोईजड होऊ लागले तेव्हा त्याला संपविल्याशिवाय खलिस्तान चळवळ संपणार नाही हे कळून चुकले. ज्या काँग्रेस पक्षाने स्वतःच्या राजकीय लाभासाठी भिन्द्रानवालेला खतपाणी घातले तेच भिन्द्रानवाले हे काँग्रेससाठी नंतर भस्मासूर ठरले. शीख समाजाचे सर्वोच्च श्रद्धास्थान असलेल्या अमृतसरच्या सुवर्ण मंदिरातच त्याने आपला तळ ठोकला होता. तेथे त्याच्यापर्यंत पोहोचणेही कठीण होते. भिंद्रानवालेला सुवर्ण मंदिरातून बाहेर काढण्यासाठी इंदिरा गांधींना लष्कराची मदत घ्यावी लागली. ऑपरेशन ब्लू स्टारमध्ये त्याची हत्या झाली. त्याच्याच दोन सुरक्षा रक्षकांनी त्याची हत्या केली असेही सांगण्यात आले.

चाळीस वर्षांपूर्वी भारतात पंजाबमध्ये घडले त्याची सुरुवात आता कॅनडात झाली आहे काय? १९८० च्या दशकात खलिस्तान समर्थकांची सुरुवात कॅनडात झाली, त्यावेळी पियरे ट्रुडो हे कॅनडाचे पंतप्रधान होते. आजचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांचे ते वडील. त्यावेळी भारतातून तलविंदर परमार हा दहशतवादी चार पोलिसांची हत्या करून कॅनडाला पळाला होता. इंदिरा गांधी या पियरे ट्रुडो यांना चांगल्या ओळखत होत्या. त्यांनी पंतप्रधान असताना कॅनडाला भेट दिली होती. मात्र १९८२ मध्ये इंदिराजींनी तत्कालीन पंतप्रधान पियरे ट्रुडो यांच्याकडे तलविंदर परमारला भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी केली तेव्हा त्यांनी ती फेटाळून लावली.

पियरे ट्रुडो हे पंतप्रधानपदावरून पायउतार झाल्यावर साधारण वर्षभराने जून १९८५ मध्ये एअर इंडियाच्या लंडन ते मुंबई फ्लाईट नंबर १८२ (कनिष्क)मध्ये मोठा बॉम्बस्फोट झाला व विमानातील सर्वच्या सर्व ३२९ प्रवासी ठार झाले. मरण पावलेल्यांत कॅनडाचेच नागरिक जास्त होते. या विमान बॉम्बस्फोटात कॅनडातील काही परिवार संपूर्ण संपले. विमानात बॉम्बस्फोट घडविण्यामागे तलविंदर परमार हाच सूत्रधार होता. जस्टिन ट्रुडोचे पिताजी पियरे ट्रुडो यांनी इंदिरा गांधींची मागणी मान्य करून तलविंदर परमारला भारताच्या स्वाधीन केले असते, तर कनिष्क विमानातील बॉम्बस्फोटाची घटना कदाचित टळली असती. जी चूक वडिलांनी केली तीच चूक आज त्यांचा मुलगा कॅनडाच्या पंतप्रधानपदावर असताना करीत आहे का? तेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या, आज नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान आहेत. निज्जर हत्येप्रकरणी जस्टिन ट्रुडो हे भारतावर गंभीर व सनसनाटी आरोप करून कॅनडातील खलिस्तानवाद्यांचे समर्थन करीत आहेत, हे मोठे दुर्दैव आहे. कॅनडातील आपले सरकार चालविण्यासाठी खलिस्तानवादी-दहशतवाद्यांचे समर्थन करणे ही पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची मोठी चूक आहे. कॅनडाचे पंतप्रधानच निज्जार हत्या प्रकरणी जाहीरपणे भारताला जबाबदार धरीत आहेत म्हणून कॅनडातील खलिस्तानवाद्यांना एकप्रकारचे बळ प्राप्त होत आहे. विशेष म्हणजे कॅनडामधील भारतीय दूतावासालाही कॅनडाने निज्जार हत्येप्रकरणात गोवले आहे व तेथील भारताच्या उच्चायुक्तांची भारतात तत्काळ पाठवणी केली आहे. भारतानेही कॅनडाच्या नवी दिल्लीतील राजदूताला मायदेशी पाठवून देऊन कॅनडाला जशास तसे उत्तर दिले आहे.

कॅनडातील खलिस्तानवाद्यांनी कॅनडातील भारतीय दूतावासापुढे निदर्शने केली. त्याची आखणी कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया परिसरातील गुरुद्वारामध्ये झाली अशीही माहिती पुढे आली आहे. कॅनडातील खलिस्तानवादी भारत विरोधी सतत काही ना काही कार्यक्रम राबवत असतात. खलिस्तानवाद्यांचे भारत विरोधी फलक गुरुद्वारांच्या अवती-भोवती नेहमीच झळकत असतात. मध्यंतरी इंदिरा गांधींच्या हत्येचा एक चित्ररथ घेऊन खलिस्तानवाद्यांनी मोठी शोभा यात्रा काढली होती.

पण त्यांना कोणी रोखले नाही हे जास्त गंभीर आहे. कॅनडाच्या भूमीवर खलिस्तान समर्थकांना कॅनडा सरकार गेली अनेक वर्षे आश्रय देत आहे आणि आता भारत विरोधी कारवायांना सुद्धा मोकळीक देत आहे. भारताच्या विरोधात मिरवणुका-मोर्च काढणे किंवा फलक झळकवणे यासाठी त्यांना पोलिसांची व अन्य यंत्रणांची परवानगी कशी दिली जाते हे गूढ आहे. स्वतः कॅनडाचे पंतप्रधानच खलिस्तानवाद्यांची बाजू घेत आहेत, त्यामुळे दिवसेंदिवस भारत-कॅनडा यांच्या संबंधात तणाव वाढत चालला आहे. कॅनडातील हिंदू लोकांची सुरक्षितता हा चिंतेचा विषय बनला आहे. भारतीय मूळ वंशाचे असलेले कॅनडामधील खासदार चंद्र आर्य यांनी खलिस्तानी कारवायांपासून कॅनडातील अल्पसंख्य असलेल्या हिंदूंना धोका निर्माण होऊ शकतो. हिंदू सध्या भयभीत आहेत, असे म्हटले आहे.

खलिस्तानी कारवाया वाढत असतानाच गुरपतसिंह पन्नू याने कॅनडातील हिंदूंनी भारतात निघून जावे अशी धमकी दिल्यानंतर कॅनडा सरकारने मात्र या देशात द्वेष व मत्सर याला जागा नाही असे स्पष्ट केले आहे. निज्जार हत्येप्रकरणी भारताने कॅनडाला तपासात सहकार्य करावे असे अमेरिकेने म्हटले आहे. त्याच अमेरिकेत शीख फॉर जस्टिसचा प्रमुख गुरपतवंत पन्नू अमेरिकन नागरिक म्हणून राहात आहे. भारताने त्याला फरार म्हणून घोषित केले आहे. भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टिगेटिव्ह एजन्सीने त्याची अमृतसर व चंदिगढमधील मालमत्ता जप्त केली आहे. कॅनडा सरकार ज्या पद्धतीने तेथील खलिस्तानवाद्यांची बाजू घेत आहे ते पाहता तोच भस्मासूर कॅनडाच्या सरकारला भविष्यात भारी पडू शकतो. कॅनडामध्ये खलिस्तानवाद्यांनी हिंसाचार सुरू केला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? नवा भिंद्रानवाले निर्माण होण्यापूर्वीच कॅनडाने वेळीस सावध व्हावे?

**- इंडिया कॉलिंग: डॉ. सुकृत खांडेकर**

# खरेदीचे बदलते मार्ग; वाण्याचे दुकान ते मॉल कल्चर

साधारण वीस एक वर्षांपूर्वी बिस्किटे किंवा घरातील इतर लहान-सहान वस्तूंची खरेदी केवळ चाळींमधील किंवा नाक्यावरील वाण्याच्या दुकानात केली जायची. कपडे खरेदीचे हक्काचे ठिकाण म्हणजे स्टेशनलगतचे छोटे-मोठे मार्केट. जेवणा-सामनासाठी मार्केटमधील किराणा मालाचे दुकान ठरलेले समजा. दुकानात जाऊन हवे ते घ्या किंवा लिस्ट दिली की, दुकानातून हे सामान घरपोच आलेच समजा. संध्याकाळ झाली की, भाज्यांची आपल्या भरड्या, चिरक्या आवाजात मार्केटिंग करणारे परप्रांतीय असोत किंवा बाजारामध्ये भाज्यांच्या जुड्यांवर पाणी शिंपडत बसलेले ते विक्रेते. गेल्या पंधरा ते वीस वर्षांपर्यंत खरेदीचा केवळ हाच मार्ग. आजही अशी खरेदी केली जाते; परंतु त्याचबरोबर मॉल संस्कृतीही बऱ्यापैकी रुजली आहे.


२०व्या शतकापर्यंत लालबाग, गिरगावसह अवघ्या मुंबईत दोन ते तीन मजल्यांच्या कौलारू चाळी, बैठी घरे मोठ्या संख्येने होती. इमारतीकरणात या चाळी भुईसपाट होऊन तिथे टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आणि मग नाक्यावरची वाण्याची दुकाने कमी होऊ लागली. हीच परिस्थिती लगतच्या ठाणे, कल्याण येथेही. याच स्थित्यंतरात ही मॉल संस्कृती हातपाय पसरू लागली. सुपारीपासून कपडे असू देत किंवा घरातील बारीक-सारीक वस्तू. या सर्वच वस्तू एकाच छताखाली मिळू लागल्या. त्यामुळे चार दुकाने फिरत वेळ घालवण्यापेक्षा एकाच मॉलमध्ये जाऊन खरेदीचा ओढा वाढू लागला. शिवाय खरेदीसोबत येथे मनोरंजनाची साधनेही आहेत. त्यात अनेक व्हरायटीज, विविध ब्रँड्सचे कपडे, किराणा माल, घरातील बारीक-सारीक वस्तूही मॉलमध्ये सहज मिळतात, तेही डिस्काऊंट कूपनसह. जे बाहेर घेताना विविध ब्रँडची दुकाने फिरावी लागतात. मात्र येथे एकाच छताखाली या सर्व वस्तू उपलब्ध असतात. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत, नक्षीदार साड्या यांनी चकचकीत काचेचे डिस्प्ले नटून गेलेले असतात. पांढऱ्या शुभ्र लाइट्सच्या प्रभावामुळे हे कपडे लक्ष वेधून घेतात. रस्त्यावरील दुकानांतील विक्रेत्यांच्या गळेपडणी व्यतिरिक्त येथे निवडीची मनाजोगती संधी, त्यात बिल पे करायच्या आधी एखादी वस्तू न घ्यावीशी वाटली, तर ती पुन्हा ठेवू शकतो, या साऱ्या मोकळ्या वातावरणामुळे मॉल संस्कृती आकर्षून घेते.

लोकांचे प्राधान्यक्रम बदलत आहेत. मॉल्स हे केवळ खरेदीचे ठिकाण नसून समाजात एकत्र येण्याचे आणि मनोरंजनाचे ठिकाण बनत चालले आहे. अनेकजण तर येथे केवळ विंडो शॉपिंग (केवळ फिरण्यासाठी), एसीची हवा खाण्यासाठी जातात, तर कॉलेजचे तरुण-तरुणीही मित्र- मंडळींसोबत बर्थडे असो वा काही पार्टी करण्यासाठी येथे येणे पसंत करतात. कारण फूड मॉलसोबतच मल्टिप्लेक्स, जॉय राईड, टॉय ट्रेन, किड्स झोन यांसह मनोरंजनाच्या इतर साधनांवरही येथे भर दिला जात आहे. त्यामुळे वीकेंडला पालकांकडून आपल्या बच्चे कंपनीला मॉलमध्ये फिरायला घेऊन येण्याचे प्रमाण वाढले आहे. शिवाय घरातील नेहमीच्या साध्या साध्या उपयोगाच्या वस्तू खरेदीसाठी महिला वर्गाचा ओढाही मॉलकडे वळतो आहे. एक वस्तू खरेदी करता करता मग नजरेसमोर असलेल्या बऱ्याच वस्तू खरेदी करण्याचा मोह ग्राहकांना आवरत नाही. त्यात कडाक्याच्या उन्हात घाम गाळत, हातात सामानाचे ओझे उचलत खरेदी करण्याऐवजी लोक आता या एसी मॉलमध्ये खरेदी करण्यास प्राधान्य देतात. युवा वर्ग तर त्यांच्याकडे स्टेटस सिम्बॉल म्हणून पाहतात. शिवाय मॉल्समध्ये खरेदी केल्याने ग्राहकांची उत्तम दर्जाची ब्रँडेड उत्पादने खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होते, ज्यामुळे त्यांना समाधान मिळते. काही किशोरवयीन मुले शो ऑफ करण्यासाठीही मॉल्समध्ये जातात. भारतात शॉपिंग मॉल्सने नवीन संस्कृतीला जन्म दिला आहे.

**क्रमशः**

**- ज्योत्स्ना कोट- बाबडे**

## शब्दकोडे-१८९



**आडवे शब्द**

१. उत्तराधिकारी ६. सुस्ती, कंटाळा ८. दोन रत्ने १०. ज्ञानेश्वारांची प्रार्थना १२. चिंतन १३. निमग्न १४. भूतांचा राजा १६. हिंमत, धैर्य १७. चहासाठी 'ढ्वबशी' १९. तऱ्हा २१. संतोष, आनंद २३. ठोक! हाण २५. सैन्याचा मालपुरवठा २७. माणूस २९. चणचण, दुर्भिक्ष्य ३०. येणारा समय ३२. गंध ३३. सोने ३४. देव ३७. हरकत, बंदी ३८. जवळचे संबंध, दाट मैत्री ४०. श्रेष्ठ पुरुष ४१. पचविणारा ४३. मिठी ४५. पायात चप्पल न घालता ४७. पटकन ५०. काळाकुट्ट ५२. हिंदीत जन्म ५४. धमनी ५५. रामदासस्वामींचा जन्मदिवस ५८. माळ ५९. कणीदार ६१. वसन, वस्त्र ६३. पुरुष ६४. पत्रातील साष्टांग नमस्कार विनंती विशेष ६६. समाजातील प्रतिष्ठा ६७. नवरदेव ६९. हिंदीत बासरी ७०. युद्ध ७२. अत्यंत मऊ धाग्याचे कापड ७४. वाळूवर रेघा मारून भविष्य सांगण्याची विद्या ७६. जनावर वगैरे सांभाळणे ७७. पुण्याचा नागरिक ७८. सामान ८०. तोंडी लावण्याचा एक पदार्थ प्रकार ८३. म्हशीचे पिलू ८४. दक्ष ८५. चाफा

**उभे शब्द**

१. उपयोग २. एक पाताळ ३. आठवण ४. गुंड, मोठा भाऊ ५. विमानांची धावपट्टी (इंग्रजी) ६. नभ ७. अगदी सारखे ८. सन्मानाची रक्कम ९. बडबड, वटवट, त्रास १०. धनुष्यबाण १५. शक्ती, बळ १८. अनुमती २०. फणसाची एक जात २१. वहीत मोकळी सोडलेली उभी जागा २२. पळणे २४. फायदा २६. लोखंडी खांब २८. उगीच २९. लाकूड चिरण्याचे एक हत्यार ३१. विसराळू ३२. घाव, प्रहार ३५. श्वासोच्छ्वास ३६. हलकट ३९. चमक, मुरगळा ४१. जल ४२. प्रेतावरील वस्त्र ४४. पक्के आश्वासन ४५. लोकांस जेवावयास घालणे ४६. लिहिलेले वाचणे ४८. रेशीमाचे जाडसर कापड ४९. अजाणता ५०. कावळ्याचे ओरडणे ५१. दार ५२. वतनदार ५३. कॉलेज (मराठी) ५६. गव्हाची एक उत्कृष्ट जात ५७. व्रत ६०. उपयोगात आणणे ६२. माघारी येणे, तव्यावर उलटून भाजणे ६५. आजूबाजूला ६८. एकरुप ७१. घाण ७३. अर्धांगवायू ७५. हिंदीत घर ७७. परत ७८. मत्स्य ७९. अंगावरील बारीक केस ८१. सडक, मार्ग ८२. सहापट

## शब्दकोडे १८८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.वळीव ३.मस ४.पराभव ७.राम ९.सावकार १०.वरपक्ष १२.पर १३.कापडचोपड १६.तपन १८.रासगरबा १९.खोपट २०.वाद २१.बाराखडी २३.खेटर २४.भरभर २६.पोप २७.तप २९.साक्ष ३०.संगीत ३२.दादला ३५.रम्य ३६.नशा ३८.चक्रवाक ४०.मालदार ४१.नवसागर ४२.चरक ४४.मनन ४५.मन ४६.चमक ४८.मधोमध ५०.रोज ५२.भरीत ५३.कळप ५४.नरम ५६.महाभारत ५८.मर्द ५९.टीका ६२.रती ६३.गजानन ६५.पाताळयंत्री ६८.चाकवत ६९.देव ७०.काळजी ७२.कव ७३.पो ७४.गबाळ ७६.वरदान ७९.रडारड ८०.सुवास ८१.मीन ८२.नरवीर

**उभे उत्तर**

१.वटका २.वऱ्हाड ३.मसाप ३अ.सवड ४.परतपरत ५.भवन ६.वर ७.राक्षस ८.बरबाद ९.साप ११.परान्नभक्षण १२.परवानगी १४.पसारा १५.चोपडी १७.पट १९.खोट २१.बारदान २२.खटला २३.खेप २५.रसा २६.पोक २८.परकर ३०.संकलन ३१.तगर ३३.दशानन ३४.चक्र ३७.ससाणा ३८.चरचरीत ३९.धोपटी ५०.रोम ५१.लोहा ५२.भरती ५३.कर्दनकाळ ५५.रसाळ ५६.मनकवडा ५७.भारत ५८.मजा ६०.कांपा ६१.संत्री ६३.गवगवा ६४.नळ ६६.तावदान ६७.यंदा ६८.चाकर ७१.जीवन ७५.बास ७७.नर ७८.तार

## जागतिक पर्यटन दीवस

या दृष्टीकोनातून २७ सप्टेंबरला संपूर्ण जगाने संकल्पकेला पाहिजे की पर्यटन हेच जनतेला आनंद प्रदान करू शकते.विश्वातीव देशांनी पर्यटनाकडे जातीने लक्ष दिले तर प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था सुदृढ आणि बळकट होण्यास मदत होईल.त्यामुळे प्रत्येक स्तरातुन पर्यटनाला चालना मिळायलाच पाहिजे. पर्यटनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात चालना मिळते. पर्यटनामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मित्रत्वाची भावना तयार होते.परंतु जानेवारी २०२० पासुन चिनीचांडालांनी पर्यटनाला व पर्यटकांना ग्रहण लावल्याचे आपण पहाले.अतीथी देव भव म्हणजे पाहुण्यांचा सन्मान करने.परंतु चीनने संपूर्ण जगाच्या पर्यटनावर व पर्यटकांवर पाणी फेरल्याचे दिसून आले.त्यामुळे आज संपूर्ण जगासाठी चीन विषेला साप झाला आहे. जगात अनेक देशांमध्ये मोठ-मोठी पर्यटन स्थळे आहेत.परंतु चामगाधड चीनी चांडालांनी पर्यटनावर ग्रहण लावल्यामुळे पर्यटनापासुन येणारे अर्थसहाय्य संपूर्ण देशांचे बंद झाले होते.परंतु आता संपूर्ण पर्यटन स्थळे पुर्ववत झाली आहे.युक्रेन पर्यटनाच्या बाबतीत व महिलांच्या सुंदरतेचे बाबतीत प्रसिद्ध आहे. परंतु गेल्या अठरा महिन्यांपासून युक्रेन -रशिया युद्धामुळे युक्रेन सध्याच्या परिस्थितीत स्मशानभूमी बनल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे चीनने श्रीलंकेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केले आहे. त्यामुळे श्रीलंकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. याकरिता सध्याच्या परिस्थितीत श्रीलंका पर्यटनावर जास्त भर देत आहे.कारण जगातील अनेक लोक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून श्रीलंकेकडे पहातात. कारण श्रीलंकेची आर्थिक बाजू बळकट करण्याचे काम पर्यटनामुळे होत असते.सध्याच्या परिस्थितीत जे-जे देश युध्दामध्ये किंवा गृहयुद्धात जखडले आहेत त्या-त्या देशावर पर्यटनाच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित झालेला आहे.त्यामुळे पर्यटनाला चालना देण्यासाठी संपूर्ण देशांनी शांततेचा मार्ग अवलंबला पाहिजे. मानवजाती, जीवसृष्टी,वन्यप्राणी, पशुपक्षी,स्थल,जल,वायु यांना जीवीत ठेवण्याकरिता व प्रदुषणावर मात करण्यासाठी जगाने पर्यटनाला प्रथम स्थान देवून पर्यटकांचे आकर्षण वाढविण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची गरज आहे.मागीलवर्षी इंडोनेशियातील बाली येथे २७ सप्टेंबरला अधिकृतरित्या जागतिक पर्यटन दिवस साजरा केला गेला होता.यात अनेक देशांचे मान्यवर उपस्थित होते.जो की विकासाचा आधारस्तंभ म्हणून ओळखला जाईल.यामुळे पर्यटन दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी आजच्या दिवशी पर्यटकांच्या हस्ते व सरकारच्या हस्ते मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करायला पाहिजे.यामुळे पर्यटकांमध्ये नवीन आशा-अपेक्षा, आकांक्षा,नवीदिशा निर्माण होईल.भारत सरकारने जागतिक पर्यटन दिवसांच्या निमित्ताने सरकारने, प्रशासनाने आणि सामाजिक संस्थांनी वृक्षलागवडीचा संकल्प घेतला पाहिजे.यामुळे पर्यटनात मोठ्या प्रमाणात भर पडल्याचे दिसून येईल.

**- समाप्त**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन





**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी नाशिक महानगराच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनाचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

आ. देवयानी फरांदे यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी नाशिक महानगराच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शन तयार करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून पंतप्रधान मोदी यांच्या जीवनाचे विविध पैलू नागरिकांसमोर मांडण्यात आलेले आहे. पंतप्रधान मोदी म्हणजे बहुआयामी व्यक्तिमत्व, चित्रांच्या माध्यमातून त्यांचे जीवन व व्यक्तिमत्त्व नागरिकांसमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

नाशकातील प्रसाद मंगल कार्यालय येथे हे प्रदर्शन असून त्याचे उद्घाटन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बावनकुळे यांच्या समवेत सरचिटणीस विक्रांत पाटील, आ. प्रा. देवयानी फरांदे, भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव, उपाध्यक्ष सुनील फरांदे, मध्य विधानसभेचे निवडणूक प्रमुख अनिल भालेराव आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जीवन हे समाजातील सर्व घटकांसाठी आदर्शवत असल्याचे सांगून एक चहा विकणारा मुलगा देशाचा पंतप्रधान होतो हा देशाच्या लोकशाहीचा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीचा विजय आहे. असे गौरवउद्गार त्यांनी काढले. पंतप्रधान मोदी यांचे जीवन एका सागराप्रमाणे असून प्रत्येक वेळेस त्यांचा नवीन गुण समोर येतो. असे नमूद करताना पंतप्रधान यांच्या जीवनावर चित्र प्रदर्शन केल्याबद्दल त्यांनी आ. देवयानी फरांदे व भाजप नाशिक महानगर यांचे अभिनंदन केले. आगामी काळात हे प्रदर्शन जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.



## सन्मान आपल्या बाप्पांचा: श्री स्वामी समर्थ मंडळाचा सन्मान

### साईकला बहुद्देशीय संस्थेचा उपक्रम

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवात उत्सवाचे पावित्र्य राखले जावे, यासाठी मंडळांकडून नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते. यासाठी मंडळाचे सदस्य दिवस रात्र मेहनत घेतात. म्हणून शहरातील श्री स्वामी समर्थ या मंडळाचा सन्मान करण्यात आला.

साईकला बहुद्देशीय संस्था नेहमीच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करत असते. धुळे शहरातील गणेशोत्साची अनेक गणेश मंडळ सामाजिक उपक्रम राबविले जातात. तसेच त्यासाठी त्या मंडळांचे कार्यकर्ते सकाळी नोकरी, व्यवसाय करुन रात्री मंडळाची कामे करतात. तर दहा दिवस विविध उपक्रम राबविले जातात. तर सामाजिक सलोखा जपण्याचे काम देखील मंडळाचे कार्यकर्ते करत असतात. म्हणून हा उपक्रम संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आला. साईकला बहुद्देशीय संस्थेमार्फत अनेक सामाजिक उपक्रमांचे नाशिक व धुळे आयोजन करण्यात येते. यावेळी संस्थचे संस्थापक अध्यक्ष प्रसाद सोनवणे, सुनीता सोनवणे, दैनिक लक्ष महाराष्ट्रचे मुख्य उपसंपादक पुरुषोत्तम पाटील , भाजयुमो तालुकासचिव विध्यार्थी आघाडी , सदस्य सहकार्य संस्थचे सदस्य रोहित आघाव, साक्षी कोळी यांच्यासह व्यायाम शाळेचे पदाधिकारी, गणेश मंडळ सदस्य उपस्थित होते.

## निधन वार्ता

### सुंदरबाई मुरलीधर नांद्रे



**पिंपळनेर ।** मूळ ब्राम्हणवेल येथील व सद्य पिंपळनेर येथे राहणारे कै.सुंदरबाई मुरलीधर नांद्रे यांचे दि.२६ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्या ब्राम्हणवेल येथील कै.मुरलीधर रुपचंद नांद्रे यांच्या पत्नी तर पिंपळनेर येथील कर्म आ मा पाटील वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक योग शिक्षक डॉ योगेश नांद्रे , रामराव नांद्रे, लहुकांत नांद्रे यांच्या आई होत्या. त्यांच्या मागे तीन मुले,चार मुली,सुना व नातवंडे असा परिवार आहे.


निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. ३१८/२०२३**

१) श्री. ताराचंद बाबुलाल माळी उ.व.-५८ धंदा-मजुरी
२) श्री. मोहन बाबुलाल माळी उ.व.-५२ धंदा - मजुरी
३) श्री. जिवन बाबुलाल माळी उ.व. ५० धंदा - मजुरी
४) लताबाई शांताराम सोनवणे उ.व.-६० धंदा - घरकाम
५) जिजाबाई आधार निकम उ.व. ७० धंदा - घरकाम
अर्जदार क्र. १ ते ५ रा. विठ्ठल मंदिर जवळ जैताणे ता. साक्री जि. धुळे
६) वजाबाई बाबुलाल माळी उ.व.-५३ धंदा - घरकाम
रा. गजानन महाराज रोड, रावन दहन मैदान, नंदुरबार ता. जि. नंदुरबार
७) कै. नारायण बाबुलाल माळी - मयत
मयताचे वारस
७.१) वंदनाबाई कैलास माळी उ.व.-४० धंदा - घरकाम
रा. घर नं. ५९, जळगावं वॉर्ड नं. ०१, जळगांव
७.२) शोभाबाई परशुराम सोनवणे उ.व.-३३ धंदा - घरकाम
रा. पंढरपुर, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव
७.३) अभिमन्यु नारायण माळी उ.व.-३९ धंदा - मजुरी
रा. अंबीका चौक, जैताणे ता. साक्री जि. धुळे
८) कै. शरद बाबुलाल माळी - मयत
मयताचे वारस
८.१) गं.भा. मंगलबाई शरद माळी उ.व.-४५ धंदा - घरकाम
रा. जैताणे ता. साक्री जि. धुळे
८.२) सौ. दिपाली प्रविण सोनवणे उ.वय.-२३ धंदा - घरकाम
रा.जैताणे ता.साक्री जि.धुळे
८.३) सौ. अलिशा योगेश माळी उ.वय.-२२ धंदा - घरकाम
रा. कापडणे ता. जि.धुळे
८.४) निशा प्रमोद माळी उ.व.-२१ धंदा - घरकाम
रा. खुडाणे ता. जि. धुळे
८.५) गणेश शरद माळी
उ.व.-२० धंदा - मजुरी
रा. विठ्ठल मंदिर, जैताणे ता. साक्री जि. धुळे
ताराचंद बाबुलाल माळी वगैरे ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही ...जाबदेणार**

अर्थी अर्जदार यांनी साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सो. साक्री यांचे कोर्टात दि.२६/०९/२०२३ रोजी दिवाणी कि. अर्ज ३१८/२०२३ चा दाखल केलेला आहे. सदर अर्जदार यांनी मयत बाबुलाल पांडू माळी यांचे कायदेशीर वारस असले बाबतचा वारस दाखला मिळण्याकरीता में, न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी में, कोर्टाने पुढील चौकशी कामकाज चालविणेकरता पुढील चौ. ता. ३०/१०/२०२३ ही निश्चित केली आहे, त्याअर्थी तमाम जनतेस, हितसंबंधीत, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, मयत बाबुलाल पांडु माळी यांचेशी कोणाचाही काहीही हितसंबंध, किंवा मयताचा वारस असले बाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर, न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी, त्याअर्थी में, कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल, त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस में, कोर्टाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ :- साक्री
दिनांक :-२६/०९/२०२३

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री** (शिक्का) **प्रभारी सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर, साक्री**






## त्रिमूर्ती नगर सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळात सामुहिक श्री ईच्छापूर्ती गणेश अथर्वशीर्ष पठण

### कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी

**नाशिक । प्रतिनिधी**

त्रिमूर्तीनगर सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक श्री ईच्छापूर्ती गणेश अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमास भाविकांनी मोठी गर्दी केली होती. परिसरातील भाविकांनी मंडळाच्या उपक्रमात सहभागी होत २१ अथर्वशीर्ष पठण केले. या सोहळ्यास अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे चंद्रकांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच त्यांच्या हस्ते यावेळी महाआरती करण्यात आली.

त्रिमूर्तीनगर सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळाच्या वतीने त्रिमूर्ती नगर येथे दरवर्षी श्री ईच्छापूर्ती गणेशाची स्थापना करण्यात येते. काल त्रिमूर्तीनगर सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळाच्या वतीने सामुहिक श्री ईच्छापूर्ती गणेश अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील भाविकांनी मंडळाच्या उपक्रमात सहभागी होत २१ अथर्वशीर्ष पठण केले. त्यानंतर अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरु पीठाचे चंद्रकांत मोरे यांनी भाविकांशी हितगुज साधत मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे, मंडळाचे अध्यक्ष संदीप गांगुर्डे, उपाध्यक्ष प्रकाश आव्हाड यांच्यासह पदाधिकारी, श्री स्वामी समर्थ सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे बावनकुळे, चौधरी, अनासपुरेंचा सत्कार

**नाशिक ।** भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महामंत्री विजय चौधरी, उत्तर महाराष्ट्र संघटक रवी अनासपुरे यांचा दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेश जनसंपर्क संघटक काकासाहेब दीक्षित, दिव्यांग विकास आघाडीचे बाळासाहेब घुगे, गोटीराम सूर्यवंशी, विनायक कस्तुरेंसह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## अविरल गोदावरी मोहीम राबविली जाणार

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासन व नाशिक महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच शहरातील नमामि गोदा फाउंडेशन, द सत्संग फाउंडेशन क्वालिटी कौन्सिलिंग ऑफ इंडिया, नाशिक झिलर्स, इंडियन स्वच्छता लीग अशा विविध स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून दि. २ आणि ३ ऑक्टोबर रोजी गोदावरी अविरल निर्मल वाहती होण्यासाठी अविरल गोदावरी मोहीम राबविली जाणार आहे. मोहिमेच्या पूर्व तयारीसाठी काल रोजी मनपा मुख्यालयात अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी मोहिमेचे ब्रॅड अँबेसिडर चिन्मय उदगीरकर उपस्थित होते. यावेळी त्यांना कार्यक्रमाविषयी माहिती देण्यात आली.

कार्यक्रमासाठी नाशिक त्रंबक नगरी ठेवूया हिरवीगार, गोदामाईची पवित्रता आपण जपू आपल्या जीवपाड, सजग आहे नाशिककर पर्यावरण प्रेमी, जोशपूर्ण वातावरण गोदावरी स्वच्छतेची घेऊ हमी, अशा प्रकारे स्लोगन देण्यात आले आहे. २ ऑक्टोबरला सकाळी ७ ते १० यावेळेत स्वच्छता अभियान रामकुंड परिसर, पंचवटी येथे राबविले जाणार आहे. तर सायंकाळी ४.३० वाजता माय ट्री चे उदघाटन एस्पालायर हेरिटेज येथे कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आध्यात्मिक व क्रियायोगाचे गुरू तसेच पाणी चळवळीचे प्रणेते श्री एम आध्यत्मिक गुरु हे अध्यात्म व सेवा या विषयावर कुर्तकोटी सभागृह येथे संवाद साधणार आहेत.

तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ज्ञ, रेमन मॅगसेसे पुरस्कार विजेते, पाणीवाले बाबा म्हणून प्रसिद्ध असलेले डॉ. राजेंद्र सिंह हे उपस्थित राहणार आहेत. तसेच ३ ऑक्टोबर रोजी 'चला जाणूयात नदीला' अंतर्गत प्राचीन कुंडांचे पुनर्जीवन, जंगल पूर्ववत करण्याचे अभियान त्रंबकेश्वर येथे डॉ.राजेंद्र सिहं व श्री. एम यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. तसेच यावेळी विविध कार्यक्रमही होणार आहे. ब्रह्मगिरी ते राजमहेंद्री दरम्यान अविरल गोदावरीसाठी सुरू केलेल्या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात येत्या २ ऑक्टोबरला शहरात प्लास्टिक संकलन केले जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मदतीने नमामी गोदा आणि सत्संग फाउंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी सर्व नाशिकरांनी सहभागी व्हावे असे आवाहन नाशिक मनपाने व अभिनेते चिन्मय उदगीरकर यांनी केले .यावेळी गोदावरी संवर्धन विभागाचे उपायुक्त विजयकुमार मुंडे, उपायुक्त प्रशांत पाटील, घनकचरा व व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ.आवेश पलोड, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, अभिनेता चिन्मय उदगीरकर, क्रेडाईचे अध्यक्ष कृणाल पाटील, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, अनिल गायकवाड, उद्योजक हेमंत राठी आदी उपस्थित होते.


अ‍ॅड. भवेश भ. वाघमारे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११३७/२०२३**

सुमन वसंत मराठे (भावसार) वगैरे ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**निरंक ...जाबदेणार**

कै.वसंत रामचंद्र मराठे (भावसार) ...**(मयत)**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. १ सोा. धुळे यांचे कडे दि. १८/९/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि. दि. अर्ज क्र. ११३७/२०२३ चा अर्ज राहुल अशोक बडगुजर यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकिय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयांतुन अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. ०४/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वैगरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काहि वाद असल्यास धुळे येथील मे दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कोर्ट नं सोा, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थीत राहुन हरकत नोंदवावी, त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. २६/०९/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधिश क.स्तर, धुळे** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे**

अ‍ॅड.अनिल किसनराव गवळी
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सोा धुळे यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११२९/२०२३**

भागाबाई पांडुरंग शिरसागर (क्षीरसागर) ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही ...जाबदेणार**

कै. पांडुरंग रतन क्षीरसागर ...**(मयत)**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ४ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट न. २. धुळे यांचे कडे दि. १६/०९/२०२३ रोजी कि. दि. अर्ज नं. ११२९/२०२३ चा अर्ज कै.पांडुरंग रतन क्षीरसागर रा. मु.पो कापडणे ता.जि.धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. पांडुरंग रतन क्षीरसागर यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि. ३१/१०/२०२३ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. २ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

दि. २७/०९/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

अ‍ॅड.कविता बी.रोकडे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश (क) स्तर सोा धुळे यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११३०/२०२३**

बारकू पंडित माळी ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कोणीही नाही ...जाबदेणार**

कै. पंडित लकडू माळी ...**(मयत)**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ६ यांनी धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट न. ३ धुळे यांचे कडे दि. १६/०९/२०२३ रोजी कि. दि. अर्ज नं. ११३०/२०२३ चा अर्ज कै. पंडित लकडू माळी रा. माळीवाडा, मु.पो. कापडणे, ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व ते कै. पंडित लकडू माळी यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.३०/१०/२०२३ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचितक, वारस वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ३ धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि. २१/०९/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश क.स्तर धुळे** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर धुळे**

**प्रोसेज जमा** **अ‍ॅड. दिपक जी. बोरसे**
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर सो. यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. ३२७/२०२३**

१) गं.भा. व्दारकाबाई पांडूरंग नेरे (नेरकर), वगैरे- ...**अर्जदार**

**॥ विरुध्द ॥**

**कुणीही नाही ...जाबदेणार**

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क. स्तर साक्री येथे दि. २७/०९/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल नामे कै. पांडूरंग सखाराम नेरे (नेरकर) यांचे निधन दि. ०३/१०/२०१३ रोजी मौजे वसमार ता. साक्री जि. धुळे येथे मयत झाले आहेत. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

| वारसांची नावे | नाते/संबंध |
|---|---|
| १) गं.भा. व्दारकाबाई पांडूरंग नेरे (नेरकर) | - पत्नी |
| २) श्री. किशोर पांडूरंग नेरे (नेरकर) | - मुलगा |
| ३) श्री. सुनिल पांडूरंग नेरे (नेरकर) | - मुलगा |
| ४) सौ. सुरेखा रोहिदास बेडसे | - मुलगी |
| ५) सौ. आशाबाई तोंगल पवार | - मुलगी |

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दूसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा वारस हक्क

असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क 'अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि.३०/१०/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायालय कोर्ट साक्री** (शिक्का) **अधिक्षक, दिवाणी न्यायालय कोर्ट साक्री**

# पांझरा नदीपात्रात पालिकेतर्फे ९ ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था

**धुळे । प्रतिनिधी**

शहरात गणेशोत्सव सुरू असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. शहरात गणपती स्थापनेची परंपरा आहे. त्यात सार्वजनिक गणेश मंडळातर्फे सामाजिक, पौराणिक देखावे साकारण्यात आले आहे. तर टप्प्याटप्प्याने गणपतीचे विसर्जनही होत आहे. यात प्रामुख्याने घरगुती गणपतीचे विसर्जन होते. सोमवारी सातव्या दिवशीही साधारणपणे महापालिकेने निर्माण केलेल्या विसर्जन स्थळावर ४५० घरगुती गणपतीचे विसर्जन वाजत गाजत करीत गणरायाला निरोप देण्यात आला आहे.

गणपती उत्सवामुळे सर्वत्र चैतन्याचे वातावरण आहे. घरोघरी प्रमाणे छोटेखानी चाळीत, अपार्टमेंटमध्येही गणपतीची स्थापना करण्यात आली आहे. या गणपतीचे आता टप्प्याने विसर्जनही सुरू झाले आहे. त्याप्रमाणे पाचव्या दिवशी घरगुती गणपतीचे मोठ्या प्रमाणात विसर्जन नदी पात्रात करण्यात आले आहे. त्यानंतरचा टप्पा म्हणजे सातव्या दिवशी होय. पांझरा नदीपात्रात महापालिका प्रशासनातर्फे ९ ठिकाणी विसर्जन स्थळांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याठिकाणी सर्व प्रकारची सुविधा देण्यात आली आहे. सोमवारी सातव्या दिवशीही शहरात छोटे गणेश मंडळ व घरगुती गणपती, खासगी प्रतिष्ठान यांच्यातर्फे सकाळपासूनच पांझरा नदी पात्रात विसर्जनासाठी वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली आहे. दुपारनंतर सायंकाळपर्यंत घरगुती गणपती विसर्जनाची संख्या वाढली होती. पांझरा नदीच्या ठिकाणी महापालिकेने विसर्जन स्थळावर पाण्याचे हौद ठेवण्यात आले आहे. अनेकजण या पाण्याच्या हौदात विसर्जन करीत आहे. काही जणांनी हत्तीडोहात पांझरेच्या पात्रात विसर्जन केले आहे. विसर्जन स्थळावर महापालिकेचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. या ठिकाणी येणाऱ्या गणेश भक्तांना विविध सूचना केल्या जात आहेत. तसेच त्यांच्याकडून निर्माल्य संकलन केले जात आहे. पालिकेने पांझरा नदी पात्रात ९ ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था केली आहे. प्रत्येक विसर्जन स्थळावर पथदिवे बसवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पाण्याचे हौद ठेवण्यात आले आहे. १० कर्मचारी प्रत्येक ठिकाणावर आहे. त्याचप्रमाणे निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र वाहन आहे. या निर्माल्याच्या संकलनानंतर त्यापासुन पालिका खत निर्मिती करते.

बांधकाम विभागाकडून खड्डे बुजवणे सुरू गणपतीचे दहाव्या दिवशी विसर्जन होते. यादिवशी सार्वजनिक गणेश मंडळाचे गणपतीचे मिरवणुकीद्वारे वाजत गाजत विसर्जन करण्यात येते. यात प्रामुख्याने हत्ती डोहाच्या ठिकाणी विसर्जन होते. त्याकरता पांझरा नदी किनारी असलेल्या साडेपाच किलोमीटर रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सुरू करण्यात आले आहे. हत्ती डोहापर्यत रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात येत आहे.



**पालिका प्रशासनाला सहकार्य करावे**

**आपल्या लाडक्या गणपती बाप्पाच्या विसर्जनासाठी धुळे महानगर पालिका प्रशासनातर्फे शहरातील विविध नऊ ठिकाणी कृत्रिम तळ्याची व्यवस्था केली आहे. विसर्जनादरम्यान नदीचे प्रदूषण होऊ नये यासाठी व्यवस्था केल्याची माहिती प्रशासनाने दिली.गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. लाडक्या बाप्पाला विसर्जन करण्यासाठी भाविकांनी पालिका प्रशासनातर्फे उभारण्यात आलेल्या कृत्रिम तळ्यातच आपल्या लाडक्या बाप्पाचे विसर्जन करून पालिका प्रशासनाला सहकार्य करावे अशी विनंती पालिका प्रशासनातर्फे करण्यात आली आहे.त्याचबरोबर आपल्या लाडक्या बाप्पाच्या सोबत घरून आणलेल्या निर्माल्यासाठी देखील स्वतंत्र व्हॅनची व्यवस्था देखील पालिका प्रशासनातर्फे करण्यात आली आहे. त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करताना कुठल्याही प्रकारचे नदीचे प्रदूषण होणार नाही या दृष्टिकोनातून नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.**

## न्यूज कॉलम

### सी. डी. देवरे विद्यालयाचे सामान्य ज्ञान परीक्षेत यश

**धुळे ।** धुळे येथील रोटरी क्लब व एमकेसीएलतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा झाली. परीक्षेत येथील सी. डी. देवरे माध्यमिक विद्यालयाच्या सातवी ते नववीच्या १४४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. नववीचा कुणाला अनिल देवरे प्रथम, आठवीचा मुकेश जगदीश खैरनार द्वितीय आला. यशस्वी विद्यार्थ्यांना सुवर्ण व रौप्यपदक, तसेच प्रमाणपत्र देण्यात आले. विद्यालयाला राष्ट्रगीत, राज्यगीत, प्रतिज्ञा व संविधान उद्देशिका यांचे पोस्टर भेट देण्यात आले. जी. आर. देवरे यांनी मार्गदर्शन केले.

### शिरडाणे प्र. नेर येथील शेतीशाळेस प्रतिसाद

**धुळे ।** आत्मा व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिरडाणे प्र. नेर येथे बाजरी पिकावर शेतकरी शेतीशाळा झाली. प्रगतिशील शेतकरी राजू पाटील यांनी बाजरी पिकावर मार्गदर्शन केले. आत्माचे योगेश पाटील यांनी कृषी योजनांची माहिती दिली. प्रकल्प संचालक आत्मा एन. एम. कोळपकर, प्रकल्प उपसंचालक विनय बोरसे, तालुका कृषी अधिकारी वाल्मीक प्रकाश, लुपीनचे राजेंद्र मासुळे व शेतकरी उपस्थित होते.

## महालक्ष्मी कॉलनी गणेश मंडळाचा बाप्पा



धुळे शहरातील जलाराम बाप्पा मंदिर परिसरातील महालक्ष्मी कॉलनी गणेश मंडळाचा गणपती व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिघांची तडीपारी

**पोलिसांच्या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत**

**सिडको । प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेहमीपणे दहशत पसरविणाऱ्या तिघांवर अंबड पोलिसांनी तडीपारची कारवाई केली आहे. या पोलिसांच्या धाडसी कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधान पसरले आहे.

या तडीपारांमध्ये लक्ष्मण उर्फ लक्षा राजेंद्र कोळी (वय २१, रा. घरकुल, शिवार चुंचाळे), निखिल सुभाष लाड (वय २२, रा. महाकाली चौक पवननगर, सिडको) तसेच सतीश बबन माने (वय २१, रा. माऊली चौक दत्तनगर अंबड) या तिघांचा समावेश आहे. अंबड पोलिसांनी ही तडीपारीची कारवाई केली आहे. पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तसेच चुंचाळे पोलीस चौकीच्या पथकाने ही कारवाई केली आहे. सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिसांनी तडीपारीसह एमपीडीए तरतुदीनुसार कारवाई प्रक्रिया सुरू केली आहे.

# गौणखनिजाची वाहतूक रोखणाऱ्या तलाठ्यास मारहाण : तिघांविरुध्द गुन्हा दाखल

**धुळे । प्रतिनिधी**

गौणखनिजाची वाहतूक रोखणार्या बाळापूर तलाठीसह पथकातील कर्मचार्यांना तिघांनी शिवीगाळ केली. तसेच तलाठीस दमदाटी करुन मारहाण केली. सदर घटना काल रात्री ट्रॅक्टरचा पाठलाग करीत असताना साईबाबा मंगल कार्यालयाजवळ घडली. याप्रकरणी पश्चिम देवपूर पोलिसांत तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

बाळापूर तलाठी मृणाल शरद नगराळे यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, एका विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरमधून नकाणे गावात गौणखनिजाची बेकायदेशिर वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. पथकातील अधिकारी व कर्मचार्यांसह नकाणे गावातील साईबाबा मंगल कार्यालय येथे संशयित ट्रॅक्टरचा शोध घेण्यात आला. रात्री ९.१० वाजेच्या सुमारास एका टी पॉईंटजवळ महिंद्रा कंपनीचा लाल रंगाचा ट्रॅक्टर निदर्शनास आला. या ट्रॅक्टरवर कुठलाही क्रमांक आढळून आला नाही. परिणामी, या ट्रॅक्टरची पहाणी केली असता ट्रॉलीमध्ये एक ब्रास मुरूम आढळून आला. यावेळी विक्की उर्फ विजय सुनिल पाटील याने ट्रॅक्टर चालकास खाली उतरण्यास सांगितले व स्वतः मुरूमसह ट्रॅक्टर पळवुन घेवून गेला. सदर ट्रॅक्टरचा पाठलाग करीत असताना नाना पाटील याने शिवीगाळ करून दमदाटी करीत मारहाण केली. तसेच सरकारी कामात अडथळा आणला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच घटनास्थळावर उपविभागीय पोलीस अधिकारी धुळे शहर विभाग सचिन हिरे, सहा.पोनि संगिता राऊत, पोउनि एम.इ.कचरे यांनी भेट देवून माहिती जाणून घेतली. या फिर्यादीवरून नाना पाटील याचेसह दादाजी पाटील, विक्की उर्फ विजय सुनिल पाटील सर्व रा.नकाणे, ता.जि. धुळे यांचे विरूध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## गरताडच्या प्रौढाचा शिरपुरात मृत्यू

**शिरपूर ।** शहरातील वरचे गाव बालाजी मंदिराजवळ बेशुद्धावस्थेत आढळलेल्या प्रौढाचे येथील उपजिल्हा रुग्णालयात निधन झाले. श्रीकांत रामकृष्ण पाटील ( वय ४४) असे मृताचे नाव असून, तो गरताड (ता. चोपडा) येथील रहिवासी आहे. २५ सप्टेंबरला दुपारी एकला वरचे गाव बालाजी मंदिराजवळ तो बेशुद्धावस्थेत आढळला. त्याला उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलिस नाईक चेतन सोनवणे तपास करीत आहेत.

# आधार फाउंडेशन मुकटीतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**धुळे । प्रतिनिधी**

मुकटी ता.धुळे जि.प.केंद्र शाळा (मुले)येथे आमदार श्री.कुणाल पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आधार फाउंडेशन मुकटीतर्फे इ.१ली ते ४थी वर्गातील १७६ विद्यार्थ्यांना सचित्र बालमित्र व शैक्षणिक साहित्य चे वाटप करण्यात आले.

सविद्यार्थ्यांना मराठी अक्षरे लिहिता वाचता यावीत, अंक व अक्षर ओळख त्यांना सुलभरित्या करता यावी, या उद्देशाने मोफत सचित्र बालमित्र व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आनंद



दिसत होता. कार्यक्रमादरम्यान शासनाचा आदर्श शिक्षिका (मुकटी जि.प.शाळा)पुरस्कार प्राप्त शिक्षिका सौ.स्मिता पाटील तसेच उपक्रमशील शिक्षक मुख्याध्यापक श्री.विश्वनाथ सोमवंशी यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. मुकटीच्या माजी सरपंच तथा आधार फाउंडेशनच्या समन्वयक अर्चना उमाकांत पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मुकटी जि.प.गटाच्या माजी सदस्या सदस्य मंगल दिलीप पाटील, सरपंच मंगल पारधी, माजी सरपंच ललिता सैंदाणे, सदस्य जिज्ञासा सैंदाणे, शिक्षण तज्ञ निवृत्त प्राचार्य नानासाहेब देवरे, निवृत्त प्राचार्य ईश्वर बडगुजर, संताजी पतसंस्थेचे चेअरमन सुभाष चौधरी, शिक्षण समिती सदस्य ईश्वर बाविस्कर, योगीराज सैंदाणे , ग्रा.पं.सदस्य डॉ. राहुल साळुंके,अशोक साळवे, कविता मोरे, संध्या दामोदर, उज्वला भंडारी, स्मिता पाटील श्रीमती कल्पना पाटील, सिमा साळवे आदि मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक विश्वनाथ सोमवंशी यांनी, सूत्रसंचालन स्मिता पाटील यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत पाटील यांनी आभार मानले.

# पर्यावरण पूरक गणेश विसर्जन कार्यक्रम साजरा

**धुळे । प्रतिनिधी**

येथील एस. व्ही. के. एम. अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत पर्यावरण पूरक गणेश विसर्जन कार्यक्रम साजरा करण्यात आला. शहरात काही दिवसांपासून गणेश उत्सव उत्सहात साजरा केला जात आहे. त्यात काही भाविक तसेच भक्तगण गणेश विसर्जन करीत आहेत.

पांझरा नदीत गणेश विसर्जन तसेच निर्माल्य विसर्जनही होत असल्यामुळे, पांझरा नदी काठ हा प्रदुषित होत आहे. सामाजिक मूल्यांची जाणीव ठेवून एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक गणेश विसर्जन कार्यक्रमांतर्गत गणेश विसर्जनाच्या दिवशी नागरिकांना विनंती करून महानगरपालिकेच्या कुंडात गणेश मूर्ती विसर्जन करण्याची विनंती केली.

# उत्तमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा

**दहिवेल । प्रतिनिधी**

येथील उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी रा से यो स्थापना दिन उत्तमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस बी देसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नवोदय शैक्षणिक संस्थेचे संचालक बाबासाहेब सत्यजित पाटील होते तर प्रमुख वक्ते माजी कार्यक्रम अधिकारी डॉ जगदीश पाटील होते.

यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रीय सेवा



योजना स्थापनेचे उद्दिष्ट्य व युवकांचा राष्ट्र उभारणीत सहभाग व योगदान याविषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ एस बी देसले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक नैतिक मूल्यांचे पालन करणारा शिस्तबद्ध स्वयंसेवक असावा तो समाजासाठी प्रेरणास्थान असावा असे सांगत या योजनेच्या माध्यमातुन अनेकांना समाजकार्याची संधी मिळाली आहे.कार्यक्रमचे प्रास्तविक प्रा डॉ योगेश कोरडे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी केले.आभार प्रा डॉ श्रीमती वंदना पाटील यांनी मानले.



# उंभरे परिसरात वादळाचा तडाखा मका पीक भुईसपाट

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

परिसरातील उंभरे येथे काल सायंकाळी साडेसात वाजता जोरदार वादळ आल्याने मका व पपई पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. दीड महिना पावसाने दडी मारल्याने जेमतेम विहिरीच्या पाण्याने पीक जगवली होती. पण काल आलेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांचे स्वप्न उध्वस्त केले असून कृषी विभाग व महसूल विभागाने तात्काळ पंचनामा करण्याची मागणी होत असून पीक विमा कंपनीने तत्काळ नुकसान भरपाई साठी पंचनामा करावा अशी मागणी उंभरे ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# टोल वसूलीबाबत वाहनधारकात गैरसमज

**बैठकीची काँग्रेस वाहतूक विभागाची मागणी**

**धुळे । प्रतिनिधी**

स्थानिक वाहनधारक आणि इतर वाहनधारकांकडून जाचक पध्दतीने टोल वसूली केली जात आहे. त्यामुळे वाहनधारकांमध्ये समज-गैरसमज निर्माण होवून अनेक वेळा वादविवाद निर्माण होत असतात. म्हणून जिल्हाधिकार्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण,राजकीय पक्षाचे पदाधिकारी, जिल्हयातील ट्रान्सपोर्ट संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेवून टोल वसूलीबाबत निर्माण झालेल्या शंकाचे निरसण करुन स्थानिक



वाहनधारकांना दिलासा द्यावा अशी मागणी धुळे जिल्हा काँग्रेस अवजड वाहतूक विभागाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी केली आहे.

याबाबत धुळे जिल्हा काँग्रेस अवजड वाहतूक विभागाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी काढेल्या पत्रकात म्हटले आहे कि,धुळे-सोलापूर, नाशिक ते सोनगीर आणि सुरत- नागपूर या महामार्गावर टोल नाक्यातून पथकर संकलन केला जातो. मात्र पथकर वसूली करणार्या आस्थापनांकडून स्थानिक वाहतूकदारांसाठी आपल्या सोयीनुसार नियम व अटी तयार करुन त्यांच्याकडून पथकर वसुल केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वाहनधारक आणि सर्वसामान्य जनतेच्या मनात गैरसमज निर्माण झाले आहेत. वरीलपैकी काही टोलनाक्यांवर स्थानिक वाहनधारकांना पथकरापासून सूट देत नाही.परंतु नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव येथील टोल नाक्यावर पथकर वसूल करणारी कंपनी परिसरातील ५० कि.मी. अंतरावरील आसपासच्या स्थानिक रहिवाशांकडून पथकरात सवलत देत असतात. तसेच फास्टटॅग सिस्टीमव्दारे पथकर घेतांना फास्टटॅगमधील बॅलन्स संपल्यावर वाहनधारकांकडून दुप्पटीने पथकर वसूल केला जातो त्यामुळे वाहनधारकांची आर्थिक पिळवणूक सुरु आहे. म्हणून टोलनाक्यातून पथकर वसूलीबाबत सुरु असलेला मनमानी कारभार आणि जनतेतील गैरसमज थांबविण्यासाठी मा.जिल्हाधिकार्यांनी पथकर वसूल करणार्या खाजगी कंपन्या, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी,जिल्ह्यातील ट्रान्सपोर्ट संघटना,नागरी संस्था,राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात यावी अशी मागणी धुळे जिल्हा काँग्रेस अवजड वाहतूक विभागाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी केली आहे. अन्यथा टोल वसूलीचा सावळा गोंधळ व मनमानी कारभाराविरोधात आ.कुणाल पाटील यांच्या माध्यमातून राज्याच्या अधिवेनशनात आवाज उठविला जाईल असेही अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी सांगितले आहे.

याबाबत धुळे जिल्हा काँग्रेस अवजड वाहतूक विभागाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी काढेल्या पत्रकात म्हटले आहे कि,धुळे-सोलापूर, नाशिक ते सोनगीर आणि सुरत- नागपूर या महामार्गावर टोल नाक्यातून पथकर संकलन केला जातो. मात्र पथकर वसूली करणार्या आस्थापनांकडून स्थानिक वाहतूकदारांसाठी आपल्या सोयीनुसार नियम व अटी तयार करुन त्यांच्याकडून पथकर वसुल केल्याचे निदर्शनास आले आहे.

## घर विकणे आहे

**चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे**

: संपर्क :

**Mo. 81779 29477**

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
गुरुवार, दि. २८ सप्टेंबर २०२३





# धुळ्यात देखाव्यातून जागवला शिवकाळ!

## मंडळांनी साकारले आकर्षण देखावे


























धुळे । शिवरायांनी वयाच्या १६ व्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात २७ एप्रिल १६४५ रोजी कान्होजी जेधे, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, सूर्याजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, बापूजी मुद्गल, नरसप्रभू गुप्ते, सोनोपंत डबीर या आपल्या बारा मावळातील सवंगड्याच्या साथीने स्वराज्याची शपथ घेतली. हा सजीव प्रसंग हिंदू एकता मित्र मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेश उत्सवात साकारला आहे. तो पाहण्यासाठी एकच गर्दी झाली होती. शहरातील अनेक मंडळांनी यवर्षीही जिवंत देखाव्यांच्या सादरीकरणावर भर दिला आहे. त्यातून अनेक पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक आणि मनोरंजनात्मक विषय हाताळले जात आहेत. या देखाव्यांमध्ये ऐतिहासिक आणि सामाजिक भान जागविणाऱ्या विषयांवर भर देण्यात येत आहे. कुठे भ्रष्टाचारावर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे, तर कुठे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा उलगडणारा देखावा साकारला आहे. तर कुठे बाललैंगिक शोषणाचा गंभीर विषय बोलका होत आहे. हा नाट्याविष्कार सादर करताना एक वेगळाच अनुभव, रसिकांची उत्स्फूर्त दाद आणि आनंद मिळत असल्याची भावना कलाकार व्यक्त करतात.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र



# धुळ्यातील गणरायाचे दर्शन

## मंडळांकडून धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



स्वराज्य ग्रुप प्रतिष्ठान




दत्त नगर मित्र मंडळ



साई गणेश मित्र मंडळ



क्रांती चौक मित्र मंडळ



रामनगर मित्र मंडळ



सूर्यमुखी मारुती मित्र मंडळ, सत्यविजय मित्र मंडळ



राजे शिवराय मित्र मंडळ



राजगुरु मित्र मंडळ



बाळ गोपाळ मित्र मंडळ



जय शिवराय मित्र मंडळ



भटाई माता चौक मित्र मंडळ



हिंदवी मित्र मंडळ



तरुण मित्र मंडळ



जय बजरंग मित्र मंडळ



मोरया मित्र मंडळ



हिंदू एकता उत्सव समिती

संकलन : दिपक वाघ